# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्याकलम ४२(६) अंतर्गत)

**अभिवेदन (Representation) क्रमांक ९३ / २०२२**

वीज जोडणी वेळेत न मिळाली म्हणून नुकसानभरपाई मिळण्याबाबत

शैलजा मोहिनीराज भणगे ........ ...................................................................................... अपिलार्थी

विरुध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, बार्शी (महावितरण) ............................................. ........... प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- शैलजा मोहिनीराज भणगे
आशुतोष भणगे, ग्राहक प्रतिनिधी

प्रतिवादीतर्फे :- सुरेश विठोबा कुऱ्हाडे, कार्यकारी अभियंता
धनराज बरची, उपकार्यकारी अभियंता
सुमित व. जाधव, उपकार्यकारी अभियंता

कोरम :- वन्दना कृष्णा (निवृत्त भा.प्र.से.)

सुनावणी तारीख :- ७ जुल २०२२

आदेश पारित दिनांक :- १० ऑगष्ट २०२२

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण, बारामती परिमंडळ, (मंच) यांच्या दिनांक २७ एप्रिल २०२२ च्या आदेशाविरुध्द उपरोक्त अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनाक २ जून २०२२ रोजी दाखल केले.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

२. मंचाने तक्रारदार यांचा केस क्रमांक ३/२०२२ बाबत दिनांक २७ एप्रिल २०२२ रोजीच्या आदेशान्वये खालील प्रमाणे निर्देश दिले.

*"१. तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत आहे.*

*२. ग्राहकाने विद्युत कनेक्शन स्थळी सुरक्षित यंत्रणा फ्युज आदी पेटी (बॉक्स) बसवून महावितरण कार्यालयाकडे कळवावा व महावितरणने त्वरीत वीज कनेक्शन देण्यात यावे त्यानंतर ग्राहकाचे वीज बील सुरू करण्यात यावे.*

*३. वीज जोडणी न देता देण्यात आलेली विद्युत देयके रद्द करण्यात यावे."*

३. अपिलार्थीच्या निवेदनातील महत्वाचे मुद्दे व दिनांक ७ जुल २०२२ रोजीच्या व्हीडीओ कॉन्फरंसतर्फे सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे आहेत.

- अपिलार्थीने नमुद केले की, त्यांनी दिनांक १० मे २०११ रोजी ५ एच पी शेती वीज जोडणीचा अर्ज महावितरणकडे केला. दिनांक २३ ऑगष्ट २०११ रोजी प्रतिवादी महावितरणकडुन रु.५७००/- चे कोटेशन देण्यात आले. अपिलार्थीने त्याच दिवशी दिनांक २३ ऑगष्ट २०११ रोजी कोटेशनचा भरणा केला. त्यानंतर दिनांक २३ फेब्रुवारी २०१२ व त्यानंतर सातत्याने वीज जोडणी मिळण्याबाबतचा पाठपुरावा केला. मात्र महावितरणच्या अधिकारी / कर्मचारी यांच्याकडुन कारणे सांगून टोलवा टोलवीची उत्तरे देण्यात आली व वीज जोडणी देण्यात टाळाटाळ कली.
- सप्टेंबर २०१५ मध्ये महावितरणच्या कार्यालयाशी संपर्क साधला असता कंपनीकडे पोल शिल्लक नाहीत. तुम्ही स्वखर्चाने पोल उभे करणार असाल, तर वीज जोडणी देता येईल असे सांगितले. वीज जोडणीची गरज होती, म्हणून स्वखर्चाने रु.७०,०००/- तातडीने खर्चुन ५ पोल उभे केले, परंतू वीज जोडणी मिळाली नाही. मार्च २०२१ मध्ये गावातील इतर शेतकरी ट्रान्सफॉर्मर सेंटर (डिपी) नादुरूस्त झाला म्हणून वर्गणी काढून नवीन डिपी आणायचा आहे म्हणून वर्गणी मागायला आले. त्यांनी वीज जोडणीच्या यादीत तुमचे नाव असल्याचे सांगितल्यावर अपिलार्थी चकित झाले. अपिलार्थीने वीज जोडणी मिळाली नाही. त्यामुळे वीज देयके आलेली नाहीत त्यामुळे वर्गणी देण्यास नकार दिला.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

- अपिलार्थीने महावितरणच्या ॲपवर शोध घेतला असता दिनांक १ एप्रिल २०१६ पासून त्यांना वीज जोडणी (ग्राहक क्र. ३४८३३०००००० व मीटर क्र.०७६D५२९२९७१) दिली असल्याचे, तसेच २०१६ पासून वीज देयके मिळत नव्हती तरी त्यांच्या नावे रु.७४२३५.९६ ची थकबाकी असल्याचे निदर्शनास आले. सदर वीज जोडणीचे मीटर वाचन होऊन ४८१६ युनीट वापर झाल्याची नोंद असल्याचे व दिनांक १० ऑगष्ट २०२१ ते १ नोव्हेंबर २०२१ या कालावधीचे रु.१७,२७०/- थकीत देयक देण्यात आले.
- माहिती अधिकार २००५ अंतर्गत सन २०११ ते २०१६ या कालावधीतील प्रतिक्षा यादी व सन २०१६ अखेरचे सीपीएल, वीज जोडणीबाबत विस्तृत माहिती, वीज देयके अदा केली नाही याची कारणे, थकबाकीबाबतची कार्यालयाची कारवाई, इत्यादीबाबतची माहिती मागीतली असता केवळ सीपीएल व स्थळ तपासणीची माहिती दिली.
- अखेर वीज जोडणी वेळेत मिळाली नाही, म्हणून अपिलार्थीने ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, बारामती येथे २ फेब्रुवारी २०२२ रोजी अर्ज दाखल केला. मंचाने असे आदेश दिले की, वीज कनेक्शन त्वरीत देण्यात यावे, त्यानंतर ग्राहकाचे वीज बील सुरु करण्यात यावे व वीज जोडणी न देता देण्यात आलेली विद्युत देयके रद्द करण्यात यावोत. मंचाच्या आदेशाने समाधान झाले नाही, म्हणून दिनांक २ जून २०२२ रोजी विद्युत लोकपाल मुंबई याना अभिवेदन सादर केले.
- अपिलार्थीने अभिवेदनात व सुनावणी दरम्यान खालील प्रमाणे मागणी केलेल्या आहेत.
  - ✓ वीज अधिकारी यांच्या सांगण्यावरून वीज जोडणीसाठी ५ पोलची उभारणी केली त्यासाठी रु.७०,०००/- इतका खर्च झाला तो परत मिळावा.
  - ✓ शेतातील बोअरवेलमधून पाणी मिळणार होते, परंतू कनेक्शन नसल्यामुळे बोअरवेलचे नुकसान झाले असल्याने दुसरी बोअरवेल घेतली त्यास रु.५५,०००/- खर्च आला त्याचा परतावा मिळावा.
  - ✓ शेतीसाठी दगडीखाणीतील पाणी डिझेल इंजिनने उपसून पिकांना दयावे लागले त्यासाठी रु.१०२०००/- इतका खर्च झाला त्याचा परतावा मिळावा.
  - ✓ दिनांक १ एप्रिल २०१६ पासून महावितरणकडून कनेक्शन दिल्याचे खोटे रेकॉर्ड तयार करून काही हजार रूपयाचे देयक देऊन माझी फसवणूक झालेली आहे. सदर थकबाकी रद्द करण्यात यावी.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

- ✓ वीज कायदा २००३ मधील कलम ४३(३) मधील तरतूदीनुसार संबधीत जबाबदार अधिकारी याच्यावर दंडात्मक कारवाई व्हावी व वीज जोडणी विलंबाबाबत नुकसान भरपाई देण्याचे आदेश व्हावेत.

४. प्रतिवादी महावितरणने अपिलार्थींने त्यांच्या दिनांक २८ जून २०२२ च्या उत्तरात नमुद केलेले व दिनांक ५ जुल २०२२ रोजीच्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणेः

- अपिलार्थी शैलजा मोहिनीराज भणगे यांना वीज जोडणी न देता वीज वापराची वीज देयके मिळाली याबाबत महावितरणकडे अर्ज केला होता. त्यावर महावितरणचे स्थळपरीक्षण शाखाधिकारी (ग्रामीण) यांनी ०१ मार्च २०२१ चे रु.४४,१६०/- चे सरासरी युनीट वापराचे देयक दुरुस्ती करुन अपिलार्थीस माहे जून २०२१ चे रु.१६,७५०/- चे देयक देण्यात आले. अपिलार्थीचे बिलींग टेरीफ मिटर नुसार असल्यामुळे स्थिर आकार हा वजावट झालेला नाही. रु.१६७५०/- या रक्कमेच्या देयक दुरुस्तीकरीता दिनांक १९ ऑक्टोबर २०२१ रोजी मुख्य कार्यालय, बिलींग व देयके विभागास प्रस्ताव पाठविण्यात आला. परंतू सदर प्रस्ताव दुरुस्ती विभागाने नामंजूर करुन कार्यकारी अभियंता बार्शी विभागाकडे दुरुस्ती करीता कार्यालयीन टिप्पणी व संबधितावर कारवाई केलेला अहवाल सादर करण्याबाबत कळविले. त्यानुसार कार्यकारी अभियंता, बाशी विभाग यांना दिनांक २१ जानेवारी २०२२ रोजी पत्रानुसार अहवाल सादर केला. अहवाल प्राप्त झाल्यावर देयक दुरुस्ती बाबत कार्यवाही करण्यात येईल. अपिलार्थीस दिनांक २३ फेब्रुवारी २०२२ रोजी वीज जोडणी देण्यात आली आहे.
- अपिलार्थीने मंचाकडे दाखल केलेल्या तक्रारीस अनुसरुन कार्यालयाने सादर केलेल्या तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मंचास दिला. मंचानेही त्यानुसार आदेश दिले आहेत.
- अपिलार्थीने दिनांक १० जून २०२२ रोजी या कार्यालयास वीज जोडणी व वीज देयक दुरुस्ती करुन मिळणेबाबत अर्ज सादर केला. त्यानुसार अपिलार्थीस दिनांक २३ फेब्रुवारी २०२२ रोजी वीज जोडणी देण्यात आली. अपिलार्थीस मार्च २०२२ अखेर रु.२७०८०/- चे देयक सादर केलेले आहे ते रद्द केले आहे व सुधारीत वीज देयके दण्याबाबत सक्षम अधिकारी यांच्या मंजुरीसाठी अधिक्षक अभियंता, सोलापुर यांच्याकडे पाठविलेले आहे.
- सुनावणी दरम्यान प्रतिवादी यांनी असे नमुद केले की, अपिलार्थी यांचे सीपीएल चे निरिक्षण केले असता असे निदर्शनास येते की, अपिलार्थी यांना दिनांक १ एप्रिल २०१६ रोजी मीटर क्र.(D5292971) ने वीजपूरवठा करण्यात आला. सदर मीटरचे सुरवातीचे रिडींग ००००१ असे होते. तर डिसेंबर २०१६ मध्ये ४८१६ केडब्लूएच असल्याचे निदर्शनास येते. पुढे मात्र RNA,

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

RNT, No Meter Status प्रमाणे बिलींग झाल्याचे दिसते. कोणत्याही स्कीमची मंजूरी नसताना अपिलार्थी स्वतःहून परस्पर पाच पोल उभे केल्याचे म्हणतात. शेतात दोन बोअरवेल घेतात. या सर्व बाबींवरून असे निर्विवाद सिध्द होते की, अपिलार्थींना वीज कनेक्शन देण्यात आले होते. मंचाच्या आदेशानूसार अपिलार्थींचे वीज देयके दुरूस्त करण्यास सक्षम अधिकाऱ्याकडे पाठविण्यात आले आहे.

- परंतू अपिलार्थींचे वीज जोडणी व वीज देयक दुरूस्तीच्या तक्रारीचे निराकरण केले आहे, त्यामुळे अपिलार्थीचे अभिवेदन फेटाळण्यात यावे, ही विनंती.

## विश्लेषण व निर्णय

५. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. अपिलार्थींनी महावितरणकडे दिनांक १० मे २०११ रोजी ५ एच पी शेती वीज जोडणीचा अर्ज केला. दिनांक २३ ऑगष्ट २०११ रोजी प्रतिवादी महावितरणकडुन रू.५७००/- चे कोटेशन देण्यात आले. अपिलार्थीने त्याच दिवशी दिनांक २३ ऑगष्ट २०११ रोजी भरणा केला.

६. अपिलार्थींच्या निवेदनानुसार, सप्टेंबर २०१५ मध्ये अपिलार्थींनी महावितरणच्या कार्यालयाशी संपर्क साधला होता, त्यावेळच्या महावितरणच्या अधिकाऱ्यांनी ५ पोल उभे करण्याचे सूचीत केले. त्यानुसार अपिलार्थींनी तातडीने रू.७०,०००/- खर्च करून ५ पोल, उभे केले, तरीसूध्दा वीज जोडणी मिळाली नाही. ५ पोल उभे करण्याबाबत प्रतिवादी याच्याकडुन कोणत्याही प्रकारचे पत्रक/प्रस्ताव अस्तित्वात असल्याचे आठळून येत नाही. मुळात अपिलार्थीने २०११ रोजी शेतीपंपाचे नवीन कनेक्शनसाठीचे कोटेशन रक्कमेचा भरणा केला. जर अपिलार्थींच्या दृष्टीने हा विषय अत्यंत जिव्हाळयाचा होता, तर, त्यांनी नियमा अंर्तगत त्वरीत 'अंतर्गत तक्रार निवारण कक्ष' व नंतर 'ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच' यांच्याकडे गाऱ्हाणे / तक्रार दाखल करणे अभिप्रेत होते. मात्र त्यांनी त्यांचे गाऱ्हाणे अंदाजे ११ वर्षानंतर ग्राहक मंचाकडे दिनांक २ फेब्रुवारी २०२२ रोजी दाखल केले. अपिलार्थींनी आपले गाऱ्हाणे मंचाकडे किमान दोन वर्षाच्या आत दाखल करणे अभिप्रेत होते. यासंबधीत त्यांनी (ग्राहक गाऱ्हाणे विनियम २०२०) मधील विनियम ७.८ खालील प्रमाणे उदधृत केला आहे.

> *"कारवाईचे कारण उदभवलेल्या दिनांकापासून दोन (२) वर्षाच्या आत तक्रार दाखल केली नसेल तर मंच गाऱ्हाणे स्वीकारणार नाही."*

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

७.	वरील सर्व बाबींचा विचार करता सदरचे प्रकरण गुणवत्तेवर, व ग्राहक गाऱ्हाणे विनियम २००६/2020 विनियम ६.६/७.८ च्या निकषावर पात्र ठरत नाही. तथापि, अपिलार्थींच्या म्हणण्यानूसार अपिलार्थीचा वीज पुरवठा अजूनही चालू झाला नाही. प्रतिवादींचे म्हणने असे आहे की, अपिलार्थीस दिनांक २३ फेब्रुवारी २०२२ रोजी एक पोल उभा करून वीज जोडणी देण्यात आली आहे. त्याबाबतची चित्रफीत या कार्यालयात देण्यात आली आहे. तथापि, अपिलार्थींनी ती चित्रफीत नाकारली आहे.

८.	सुनावणी दरम्यान विद्युत लोकपाल मुंबई यांनी सदर प्रकरणो पंचनामा करण्याचे निर्देश दिले. प्रतिवादींने दिनांक ३ ऑगष्ट २०२२ च्या पत्रान्वये पंचनाम्याची प्रत या कार्यालयास सादर केली. पंचनाम्यात खालील प्रमाणे नमुद केले आहे.

*"आज दिनांक १९/0७/2022 रोजी सकाळी ११.१५ वाजता गट नं.१७ मौजे धायखिंडी येथील सौ शैलजा मोहिनीराज भनगे यांच्या शेतात बोअर जवळ वीज कनेक्शन जोडणी केली किंवा केली नाही आणि लघुदाब वाहिनीचे पोल उभा आहेत की नाहीत या संदर्भात घटनास्थळ पाहणी अहवाल पंचनामा करणेसाठी खालील प्रमाणे पंच व अधिकारी आणि ग्राहक प्रतिनिधी उपस्थित आहेत.*

*पंच १) श्री.बी.डी. अनभुले, तलाठी*
*२) श्री.जी.आर. नायकुडे, ग्रामसेवक*
*३) सौ. अनिता बाळासाहेब मोटे, सरपंच, ग्रामसेवक धांडे*
*व इतर ..........*

*मौजे धायखिंडी हद्दीतील गट क्र.१७ चे सौ शैलजा मोहिनीराज भनगे यांचे शेतीमधील पश्चिम बाजुकडील बाधांवर ६३ केव्हीए जुना गावठाण एजी डिपीवरून आलेल्या लघुदाब वाहिनीचा नववा क्रमांकाचा पोल उभा आहे. सदरील लघुदाब वाहिनी ३ फेज ४ वायर आहे. त्या पोलवरून पर्वेकडे बोअर जवळ आणखी एक पोल उभा केला आहे तसेच सदर दोन्ही पोलमध्ये केबल जोडलेली आहे. बोअर जवळील पोलच्या तळाशी संरक्षक पेटी असून त्यामध्ये फ्युज जोडलेले आहेत त्या पेटीमधील केबल बोअरच्या मोटरला जोडलेली आहे. संरक्षक पेटीपासून 0४ फुटावरती इनकमींग केबल वायर, पोलला गुंडाळलेली आहे परंतू पेटीस जोडलेली नाही असे आढळून आले."*

यावरून, सध्यातरी, अपिलार्थींचा वीज पुरवठा चालू नाही असे दिसते.

९.	ग्राहक गाऱ्हाणे विनियम २०20 या विनियमात अप्रत्यक्ष नुकसान भरून देण्याची कोणतीही तरतूद नाही. या संदर्भात विनियम क्र.२०.४ (इ) ची तरतूद लक्षात घेणे गरजेचे आहे.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai
M.E.R.C.

*"२०.४ (इ) ग्राहकाने सहन केलेल्या कोणत्याही तोटा किंवा नुकसानीकरीता तो (विद्युत लोकपाल) निवाडा देईल ती रक्कम भरपाई म्हणून तक्रारदाराला अदा करण्याचा निर्देश; आणि / किंवा*

*परंतू तथापि असे की, ग्राहकाला कोणत्याही प्रकरणी, अप्रत्यक्ष, परिणामस्वरूप, आनुषंगिक, दंडात्मक किवा दहशती नुकसान, संधी अथवा लाभाचे नुकसान यासाठी भरपाई मिळण्याचा हक्क राहणार नाही; "*

१०. सदर अभिवेनाबाबत सर्व बाबींचा उहापोह करून मंचाने, योग्य तो निर्णय दिला आहे. त्यामुळे मंचाच्या आदेशात कुठलाही बदल करावा, असे मला वाटत नाही. प्रतिवादींना निर्देशीत करण्यात येत आहे की,

- अपिलार्थींना ३० सप्टेंबर २०२२ पर्यंत वीज जोडणी देण्यात यावी.
- अपिलार्थींच्या इतर मागण्या नामंजूर करण्यात येत आहेत.
- आदेशाच्या दिनांकापासून दोन महिन्याच्या आत अनुपालन अहवाल सादर करावा.
- अपिलार्थीने सदर अभिवेदन सादर करताना भरलेली अनामत रक्कम रु.६०००/- अपिलार्थीस परत करण्यात यावी.
- सबब, सदरचे प्रकरण निकाली काढण्यात येत आहे.

सही/-
(वंदना कृष्णा)
विद्युत लोकपाल (मुंबई)

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.